सन २००८-०९ या आर्थिक वर्षामध्ये अर्थसंकल्प
वितरण प्रणालीद्वारा लेखानुदान वितरित करणेबाबत

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
शासन परिपत्रक क्रमांक :अविप्र-१०.०८ प्र.क्र.१४ अर्थसंकल्प-४.
दिनांक : १७ .एप्रिल. २००८.

संदर्भ : शासन परिपत्रक क्रमांक :अविप्र-११.०७ प्र.क्र.३२(अ)/ अर्थसंकल्प-४.दिनांक : १३ मार्च, २००८.

परिपत्रक

उपरोक्त संदर्भाधीन परिपत्रकान्वये सन २००८-०९ या आर्थिक वर्षामध्ये अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारा मासिक निधी वितरणपत्र सादर करणेसंदर्भात आदेश निर्गमित करण्यात आलेले होते.त्यानुसार लेखानुदानाद्वारे प्राप्त होणाऱ्या अनुदानापैकी ५०% अनुदान एप्रिल महिन्याकरिता तर ५०% अनुदान मे महिन्याकरिता दर्शविण्यात येऊन या दोन महिन्याकरिता मासिक निधी विवरणपत्राची अट राहणार नाही. तथापि उर्वरित महिन्यांकरिता प्रशासकीय विभागांनी मासिक निधी विवरणपत्र सादर करणे आवश्यक राहील असे नमूद करण्यात आले होते.

२. आता सन २००८-०९ या आर्थिक वर्षाचे लेखानुदान अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर दर्शविण्यात आलेले आहे. तथापि हे अनुदान अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर वितरित करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यास काही कालावधी लागणार असल्याने सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना आवश्यक ती देयके अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारा प्राधिकारपत्र तयार करून काढता यावीत तसेच कोषागारात देयक सादर न करता (LOC officer ) थेट धनादेश निर्गमित करणाऱ्या विभागांना प्राधिकारपत्र काढता यावे यासाठी अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

३. अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध करून देण्यात आलेल्या या सुविधेअंतर्गत आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी प्रणालीवर Log in केल्यावर Bill entry च्या तक्त्याखालील NEW SCHEME या बटणावर क्लीक केल्यास आवश्यक असणारा योजना सांकेतांक व तपशीलवार शीर्ष टाकून Bill entry करता येईल. या सुविधेद्वारा उणे (-) रकमेच्या देयकाची प्राधिकारपत्रे तयार होतील.

४. सदरची सुविधा ही फक्त .एप्रिल २००८ पर्यंत उपलब्ध राहील.सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांचा खर्च लेखानुदानाच्या मर्यादेत राहील याची दक्षता घ्यावी. आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी ज्या लेखाशीर्षाखाली त्यांना अर्थसंकल्पीय अनुदान उपलब्ध झालेले आहे, ती रक्कम तरतूदप्रमाणे आहे याची स्वत: खात्री करावी. कोषागार अधिकाऱ्यांनी एप्रिल २००८ मध्ये अर्थसंकल्पीय तरतूद आहे किंवा नाही याबाबत कोणतेही आक्षेप न घेता सर्व देयके तपासावीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(ग.प्र.कानडे)
उप सचिव, वित्त विभाग.

प्रति,
अ.मु.स./प्र.स./सचिव (सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग)
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य वित्त व लेखा अधिकारी
संचालक लेखा व कोषागारे, मुंबई.
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
सह संचालक, लेखा व कोषागारे, पुणे, नाशिक, नागपूर, अमरावती, औरंगाबाद, कोकण भवन, नवी मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
सर्व कोषागार अधिकारी
सर्व उप कोषागार अधिकारी (संचालक लेखा व कोषागारे, मुंबई यांचेमार्फत)
वित्त विभागातील सर्व कार्यासन/निवडनस्ती, वित्त विभाग, अर्थसंकल्प-४